# गौण खनिज

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६, कलम २४ आणि ४८ मध्ये गौण खनिजाची माहिती खालील प्रमाणे दिलेली आहे. तसेच गौण खनिजाबाबत, खाणी अधिनियम १९५२ ; खाणी व खनिजे अधिनियम १९५७ ; महाराष्ट्र जमीन महसूल (गौण खनिजाचे उत्खनन व ती काढून नेणे) नियम १९६८ ; महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व नियमन) २०१३ असे नियम व कायदे करण्यात आले आहेत.

अनेकदा आपण महसूल अधिकारी म्हणून अनधिकृत पध्दतीने होणाऱ्या गौणखनिज उत्खननावर आणि वाहतुकीवर धाड घालतो. अशावेळेस अर्ज, आवश्यक कागदपत्रे, जबाब व पंचनामे कसे असावेत/लिहावेत याबाबत या लेखात माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे.

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६, कलम २४:** ↓

**विवक्षित जमिनींतून अनधिकृतपणे काढून नेलेल्या नैसर्गिक उत्पन्नाची किंमत वसूल करणे:** जी कोणतीही व्यक्ती एखाद्या विशेष कारणासाठी वेगळ्या ठेवलेल्या कोणत्याही जमिनीतून किंवा सरकारची मालमत्ता असलेल्या कोणत्याही जमिनीतून, कोणतेही नैसर्गिक उत्पन्न (झाडे सोडून) अनधिकृतपणे काढून नेईल ती व्यक्ती शासनाला त्याची किंमत देण्यास आणि त्याशिवाय अशा रीतीने काढून नेलेल्या नैसर्गिक उत्पन्नाच्या किंमतीच्या पाचपटीपेक्षा अधिक नसेल इतका दंड देण्यास पात्र असेल. अशी किंमत व दंड जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे तिच्याकडून वसूल करण्यात येईल.

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६, कलम ४८:** ↓

**खाणी व खनिजे यांवरील शासनाचा हक्क**

**१)** सोडून दिलेल्या किंवा चालू असलेल्या सर्व खाणी आणि दगडाच्या खाणी, जुने ढिगारे, खड्डे, शेते, बांध, नाले, खाड्या, नदीची पात्रे आणि अशा इतर जागा धरून जमिनीवर किंवा जमिनीखाली सापडणाऱ्या सर्व खनिजावरील हक्क शासनाकडे स्पष्टपणे राखून ठेवण्यात आला आहे आणि तो स्पष्टपणे राखून ठेवण्यात आला असल्याचे याद्वारे जाहीर करण्यात येत आहे आणि तो शासनाकडे निहित होईल व अशा हक्कांचा योग्य तो उपभोग घेण्यासाठी आवश्यक असलेले सर्व अधिकार शासनाला असतील.

**२)** खाणी व दगडाच्या खाणी यावरील हक्कात खाणी आणि इतर दगडाच्या खाणी चालू करण्यासाठी त्या जमिनीवर जाण्याच्या हक्काचा आणि तद्नुषंगिक कारणाकरिता जी अन्य जमीन आवश्यक असेल ती कब्जात घेण्याच्या हक्काचा समावेश होतो. तसेच या आनुषंगिक कारणात कार्यालय व मजुरांची घरे उभारणे आणि यंत्र बसविणे, खनिजांच्या राशी लावणे आणि निरुपयोगी वस्तूंचा ढीग करून ठेवणे, रस्ते, रेल्वे व ट्राम बांधणे आणि खाणी व खनिजे यांना आनुषंगिक म्हणून राज्य शासन घोषित करील अशा इतर कोणत्याही प्रयोजनांसाठी आवश्यक अशी जमीन कब्जात घेण्याच्या हक्काचाही समावेश होतो.

**३)** कोणतीही खनिजे, खाणी किंवा दगडाच्या खाणी यावरील आपल्या हक्कांचे राज्य शासनाने जर कोणत्याही व्यक्तीकडे अभिहस्तांकन केले असेल आणि अशा हक्कांचा योग्य उपभोग घेण्यासाठी पोटकलमे (१) व (२) यात विनिर्दिष्ट केलेल्या सर्व किंवा कोणत्याही

अधिकारांचा वापर करणे आवश्यक असेल तर, जिल्हाधिकाऱ्यास लेखी आदेशाद्वारे, ती विनिर्दिष्ट करील अशा शर्तींना न निर्बंधांना अधीन राहून, ज्यास असा हक्क अभिहस्तांकित करून दिला असेल त्या व्यक्तीकडे ते अधिकार सोपविता येतील.

परंतु, परिणाम होणाऱ्या जमिनीवर ज्यांचे हक्क असतील अशा सर्व व्यक्तींवर रीतसर नोटीस बजावून त्यांच्या हरकती ऐकून घेऊन त्यावर विचार करण्यात येईपर्यंत असा कोणताही अधिकार सोपवता येणार नाही.

**४)** वर उल्लेखिलेले हक्क कोणत्याही जमिनींवर वापरीत असताना त्या जमिनीच्या पृष्ठभागावर कब्जा केल्यामुळे किंवा तो बिघडल्यामुळे जर कोणत्याही व्यक्तीच्या हक्कांचे उल्लंघन होत असेल तर शासन किंवा त्यांचा अभिहस्तांकिती अशा उल्लंघनाबद्दल त्या व्यक्तींना नुकसान भरपाई देईल आणि एकवाक्यता न झाल्यास अशा नुकसानभरपाईची रक्कम जिल्हाधिकारी ठरवील किंवा त्याचा निवाडा मान्य न झाल्यास भूमि संपादन अधिनियम, १८९४ च्या तरतुदींस अनुसरून दिवाणी न्यायालय ठरवील.

**५)** ज्यांच्या हक्कांचे उल्लंघन होते त्या व्यक्तींना द्यावयाची नुकसानभारपाई ठरवून ती त्यांना देण्यात येत नाही तोपर्यंत राज्य शासनाचा कोणताही अभिहस्तांकिती, जिल्हाधिकाऱ्याच्या पूर्व मंजुरीशिवाय कोणत्याही जमिनीच्या पृष्ठभागावर प्रवेश करणार नाही, किंवा त्याचा भोगवटा करणार नाही.

परंतु, ज्या प्रकरणात पोट-कलम (४) अन्वये नुकसानभरपाईची रक्कम ठरविण्याचा प्रश्न दिवाणी न्यायालयाकडे निर्णयार्थ पाठविण्यात आला असेल अशा प्रकरणात अशा न्यायालयाकडून निवाडा देण्यात येईपर्यंत जिल्हाधिकाऱ्याने अंतरिम परवानगी देणे हे कायदेशीर असेल.

**६)** राज्य शासनाचा अभिहस्तांकिती कलम (४) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे नुकसानभरपाई देण्यात कसूर करील तर जिल्हाधिकाऱ्यास, नुकसानभरपाई मिळविण्याचा हक्क असलेल्या व्यक्तीच्यावतीने अशी नुकसानभरपाई जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे त्याच्याकडून वसूल करता येईल.

**७)** जर कोणतीही व्यक्ती कायदेशीर प्राधिकारावाचून, ज्यावरील हक्क राज्य शासनामध्ये निहित झाला आहे व राज्य शासनाने त्याचे अभिहस्तांकन केलेले नाही अशा चालू असलेल्या किंवा सोडून दिलेल्या खाणी, दगडाच्या खाणी, जुने ढिगारे, शेते, बांध (शेतीच्या बंधाऱ्याची दुरुस्ती किंवा बांधकाम करण्याच्या सबबीवरून किंवा इतर कोणत्याही सबबीवरून), नाले, खाड्या, नदीची पात्रे किंवा अशा इतर कोणत्याही जागा यामधून कोणतेही खनिज काढील, काढून नेईल, गोळा करील, पुन:स्थापित करील, उचलून घेईल किंवा त्याचा विनियोग करील तर त्याच्याविरुद्ध अन्य पद्धतीने जी कोणतीही कारवाई करण्यात येईल त्यास बाध न येता, ती अशाप्रकारे, यथास्थिति, काढलेल्या, काढून नेलेल्या, गोळा केलेल्या, पुन:स्थापित केलेल्या, उचलून नेलेल्या, किंवा विनियोग केलेल्या या खनिजाच्या बाजारमुल्याच्या “पाचपट इतकी शास्तीची रक्कम जिल्हाधिकाऱ्याने किंवा याबाबतीत जिल्हाधिकाऱ्याने प्राधिकृत केलेल्या तहसीलदाराच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा कोणत्याही महसुली अधिकाऱ्याने, लेखी आदेश दिल्यावर” देण्यास पात्र असेल.

परंतु, अशा रितीने ठरवलेली रक्कम एक हजार रुपयांहून कमी असेल तर, शास्ती ही, जिल्हाधिकाऱ्यास लादता येईल अशी, एक हजार रुपयांहून अधिक नसेल अशी तीपेक्षा कोणतीही मोठी रक्कम असेल.

**८)** पोट-कलम (७) च्या तरतूदींस बाधा न येता जिल्हाधिकाऱ्यांस किंवा याबाबतीत जिल्हाधिकाऱ्याने प्राधिकृत केलेल्या तहसीलदाराच्या दर्जापेक्षा कमी दर्जाच्या नसेल अशा कोणत्याही महसुली अधिकाऱ्यास ज्यावरील हक्क राज्य शासनाकडे निहित आहे व राज्य शासनाचे ज्याचे अभिहस्तांकन केलेले नाही अशा कोणत्याही खाणीतून, दगडाच्या खाणीतून किंवा पोटकलम (७)

मध्ये उल्लेखिलेल्या कोणत्याही जागेतून काढलेले, हलविलेले, गोळा केलेले, दुसऱ्या जागी नेलेले, उचलून घेतलेले किंवा विल्हेवाट लावलेले कोणतेही खनिज ताब्यात घेता येईल व ते सरकारजमा करता येईल, आणि तसेच त्यास, गौण खनिजे अनिधिकृतपणे काढण्यासाठी, हलविण्यासाठी, गोळा करण्यासाठी, दुसऱ्या जागी नेण्यासाठी, उचलून घेण्यासाठी किंवा त्याची विल्हेवाट लावण्यासाठी वापरलेली कोणतीही यंत्रसामग्री व साधनसामग्री आणि त्यांच्या वाहतूकीकरिता नेमलेली वाहतूकीची कोणतीही साधने ताब्यात घेता येतील आणि ती सरकारजमा करता येतील.

◆ महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण- भाग चार ,दिनांक- १७ ऑगस्ट, २०१५ अन्वये- *"गौण खनिजे अनिधिकृतपणे काढण्यासाठी, हलविण्यासाठी, गोळा करण्यासाठी, दुसऱ्या जागी नेण्यासाठी, उचलून घेण्यासाठी किंवा त्याची विल्हेवाट लावण्यासाठी किंवा त्याच्या वाहतूकीसाठी वापरण्यात आलेली पोट-कलम (१) अन्वये ताब्यात घेतलेली अशी यंत्रसामग्री किंवा वाहतुकीची साधने, अशा प्रकारे ती ताब्यात घेतल्याच्या अठ्ठेचाळीस तासांच्या कालावधीच्या आत, जिल्हाधिकाऱ्यांसमोर किंवा याबाबतीत जिल्हाधिकाऱ्याने प्राधिकृत केलेल्या उप जिल्हाधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा इतर अधिकाऱ्यांसमोर सादर करण्यात येईल, ज्यास, अशी ताब्यात घेतलेली यंत्रसामग्री, साधनसामग्री किंवा वाहतूकीची साधने त्यांच्या मालकाने विहित करण्यात येईल अशी शास्ती प्रदान केल्यावर, आणि तसेच, अशी ताब्यात घेतलेली यंत्रसामग्री, साधनसामग्री व वाहतूकीची साधने यांचा वापर, भविष्यात अनधिकृतपणे गौण खनिजे काढण्यासाठी, हलविण्यासाठी, गोळा करण्यासाठी, दुसऱ्या जागी नेण्यासाठी, उचलून घेण्यासाठी किंवा त्याची विल्हेवाट लावण्यासाठी व त्याची वाहतूक करण्यासाठी करणार नाही असे नमूद असलेला, ताब्यात घेतलेला यंत्रसामग्री, साधनसामग्री किंवा वाहतूकीची साधने यांच्या बाजारमूल्यापेक्षा अधिक नसेल इतक्या रकमेचा वैयक्तिक जाचमुचलका दिल्यावर, अशी ताब्यात घेतलेली यंत्रसामग्री, साधनसामग्री किंवा वाहतूकीची साधने सोडून देता येतील."*

**९)** गाव, नगर किंवा शहर यातील रहिवाश्यांना त्यांच्या घरगुती, शेतीच्या किंवा धंद्याच्या वापरासाठी आवश्यक असलेली गौण खनिजे, नियमात निर्दिष्ट करण्यात येईल अशी फी देऊन किंवा विनामूल्य काढण्याबाबतचे किंवा काढून नेण्याबाबातचे नियमन करण्यासाठी राज्य शासनाला नियम करता येतील.

**१०)** या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, गौण खनिजाच्या उत्खननासाठी तो भाडेपट्ट्याने देणे किंवा अनुज्ञप्ती देण्यापूर्वी आणि भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४४ मधील खंड (१) अन्वये विनिर्दिष्ट क्षेत्रामधील गौण खनिजांच्या उत्खननाचा लिलाव करण्यापूर्वी, ग्रामसभेची किंवा पंचायतीची योग्य त्या पातळीवरील परवानगी घेण्याचे बंधन राहील.

'गौण खनिज' ची व्याख्या, खाणी अधिनियम,१९५२, कलम (२-जे) व खाणी व खनिजे अधिनियम,१९५७, कलम ३(इ) मध्ये स्पष्ट केलेली आहे. महाराष्ट्र जमीन महसूल (गौण खनिजांचे उत्खनन व ती काढणे) नियम १९६८ अन्वये राज्य शासनाला ज्या गौण खनिजासंबंधी नियम करण्याचा अधिकार प्रदान करण्यात आलेला आहे. गौण खनिजांमध्ये दगड, माती, कंकर, बारीक खडी, वाळू किंवा मुरुम यांचा समावेश होतो.

✓ महाराष्ट्र शासन राजपत्र, दिनांक २१/७/२०१४ अन्वये महाराष्ट्र जमीन महसूल (गौण खनिजाचे उत्खनन व ती काढून नेणे) नियम १९६८ च्या नियम ४ मध्ये सुधारणा करुन तहसिलदार किंवा नायब तहसिलदार यांच्या पूर्व परवानगीने, कोणत्याही पिढीजात कुंभाराच्या कुटूंबास, विटा, कौले व इतर वस्तू तयार करण्यास, खाजगी किंवा शासकीय पडीत जमिनीतून ५०० ब्रास पर्यंत माती कोणतेही स्वामित्वधन न देता काढता येते.

✓ महाराष्ट्र शासन राजपत्र, दिनांक ७/३/२०१४ अन्वये महाराष्ट्र जमीन महसूल (गौण खनिजाचे उत्खनन व ती काढून नेणे) नियम १९६८ च्या नियम ४ अ जादा दाखल करुन जिल्हाधिकारी, अप्पर जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी किंवा तहसिलदार यांच्या पूर्व परवानगीने, कोणत्याही वडार समाजातील, हाताने दगडफोडीचा पिढीजात व्यवसाय करणाऱ्या कुटूंबास, खाजगी किंवा शासकीय पडीत जमिनीतून २०० ब्रास पर्यंत दगड कोणतेही स्वामित्वधन न देता काढता येते.

✓ महाराष्ट्र शासन राजपत्र, दिनांक ११/५/२०१५ अन्वये महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व नियमन) २०१३ मध्ये सुधारणा करुन, जमिनीच्या भूखंडाचा विकास करतांना, मातीचे उत्खनन करून ती माती त्याच भूखंडाच्या सपाटीकरणासाठी वापरल्यास अशा मातीवर कोणतेही स्वामित्वधन आकारले जाणार नाही.

✓ महाराष्ट्र परिपत्रक क्र. गौखनि-१०/०३०७/प्र.क्र.५७/ख, दिनांक ७/१/२०११ अन्वये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने भाडेपट्ट्याने मंजूर केलेल्या भूखंडाचा विकास करतांना, मातीचे उत्खनन करून ती माती त्याच भूखंडाच्या सपाटीकरणासाठी वापरल्यास अशा मातीवर कोणतेही स्वामित्वधन आकारले जाणार नाही. परंतू अशी माती इतरत्र वापरल्यास किंवा तिची विक्री केल्यास ती स्वामित्वधन देय होईल.

✓ महाराष्ट्र परिपत्रक क्र. गौखनि-१०९२/प्र.क्र.५२/ख, दिनांक १९/३/१९९९ अन्वये, शेतकरी किंवा कुंभार समाजाच्या लोकांनी गावतळी, पाझर तलाव, बंधारे यांतून कार्यकारी अभियंता/उपअभियंता यांच्या पूर्व परवानगीने, गाळ काढून नेल्यास कोणतेही स्वामित्वधन आकारले जाणार नाही.

| महाराष्ट्र शासनाने दिनांक ११.५.२०१५ रोजी केलेली गौण खनिज दरात वाढ आणि दिनांक १२.६.२०१५ रोजी बाजारमुल्याच्या पाचपट दंडाची केलेली तरतुद | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | गौ.ख. प्रकार | स्वामित्व मूल्य (रु.) | प्रस्तावित बाजार मूल्य (रु.) | २ ब्रास बाजारमूल्यावर दंड (रु.) | २ ब्रास गौ.ख. वर | | २ ब्रास गौ.ख. वर एकूण दंड (रु.) |
| | | | | | स्वामित्व मूल्य (रु.) | बाजार मूल्यावर पाचपट दंड (रु.) | |
| १ | वाळू | ४००/- | ९,९००/- | १९,८००/- | ८००/- | ९९,०००/- | ९९,८००/- |
| २ | खडी | २००/- | १,६९४/- | ३,३८८/- | ८००/- | १६,९४०/- | १७,७४०/- |
| ३ | दगड | २००/- | ९८१/- | १,९६२/- | ८००/- | ९,८१०/- | १०,६१०/- |
| ४ | माती | २००/- | ४००/- | ८००/- | ८००/- | ४,०००/- | ४,८००/- |
| ५ | दगड भूकटी | २००/- | ८९१/- | १,७८२/- | ८००/- | ८,९१०/- | ९,७१०/- |

## <u>गौण खनिजाबाबत जबाब व पंचनामे कसे लिहावेत</u>

***<u>टिप</u> - हे नमुने हस्तलिखित किंवा टंकलिखित करण्यात यावे. यांचा फॉर्म तयार करुन गाळलेल्या जागा भरू नयेत कारण गाळलेल्या जागा भरून केलेले जबाब व पंचनामे न्यायालयात फेटाळले जातात.***

☞ **<u>अनाधिकृत गौणखनिज उत्खनन जबाब</u>**

**जबाब**

मा. ..................................(*पदनाम*), तालुका ................................जिल्हा................................ यांचे समोर,
मी, नामे ............................................................................................. वय........, धंदा ............................
रा. ...................................................
विचारलेवरुन सत्यप्रतिज्ञेवर जबाब देतो की, आज दिनांक ..../......./२०..... रोजी ............ *(वेळ)* वाजण्याच्या सुमारास, मी, मौजे .........................तालुका..............., जिल्हा ................... येथील ............................ (नदीचे/ओढ्याचे नाव) पात्रातून / गट/सर्वे नं. ............................. येथून अनाधिकृतरित्या, ......................... *(वाळू / मुरूम / दगड / माती / खडी इ.)* प्रकाराचे अंदाजे ......................ब्रास ............................ गौण खनिज उत्खनन करून वाहन ट्रक / ट्रॅक्टर क्रमांक ..................... ................................ ट्राली क्रमांक ................. यामध्ये भरत असतांना/ भरुन नेत असतांना, मला पकडण्यात आले आहे.

माझे ताब्यात असलेला उपरोक्त वाहन ट्रक / ट्रॅक्टर क्रमांक ................................ ट्राली क्रमांक ................. हे माझ्या मालकीचे आहे/ मी उपरोक्त वाहनाचा चालक असून सदरचे वाहन श्री. ..............................................., पत्ता .......... ............................ यांच्या मालकीचे आहे.

गौण खनिज उत्खनन करणेकामी माझेकडे कोणत्याही सक्षम अधिकाऱ्याने दिलेला परवाना नाही.
गौण खनिजाचे अनाधिकृत उत्खनन आणि वाहतूक करणे हा शासकीय मालमत्ता चोरणे अशा स्वरूपाचा गुन्हा होतो याची मला कल्पना असूनही मी हे कृत्य केले आहे.

सदरच्या मी दिलेल्या जबाबावा मी सही / अंगठा करणेपुर्वी तो मला वाचून दाखविला असून तो माझे माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे. सदरचा जबाब मी स्वखुशीने, कोणत्याही दबावाला बळी न पडता दिलेला आहे.
हा जबाब दिला.

जबाब देणाऱ्याची सही /अंगठा

समक्ष
तलाठी / मंडळ अधिकारी /
तहसीलदार / उपविभागीय अधिकारी

दिनांक: ........./............/२०

☞ **<u>अनाधिकृत गौणखनिज वाहतूक जबाब</u>**

**जबाब**

मा. .................................(*पदनाम*), तालुका ...............................जिल्हा................................ यांचे समोर,

मी, नामे ....................................................................................................... वय........, धंदा ...........................

रा. ...................................................

विचारलेवरुन सत्यप्रतिज्ञेवर जबाब देतो की, आज दिनांक ..../......./२०..... रोजी ............ *(वेळ)* वाजण्याच्या सुमारास, मी, ...................................... या रस्त्याने, ट्रक / ट्रॅक्टर क्रमांक ..................... ..........................मधुन जात असतांना मा. .................................(*पदनाम*), तालुका ...............................जिल्हा...........................यांनी मौजे ......................... तालुका.............., जिल्हा ..................च्या जवळपास, अंदाजे ......................... वाजता माझे वाहन अडविले.

माझ्या वाहनाची तपासणी केली असता त्यात अंदाजे ................ *(वाळू / मुरूम / दगड / माती / खडी इ.)* प्रकाराचे अंदाजे .....................ब्रास गौण खनिज आढळले. सदरचे गौण खनिज मी, मौजे ...................  येथील ............................ (नदीचे/ओढ्याचे नाव) पात्रातून / गट/सर्वे नं. ............................. येथून घेऊन आलो आहे.

माझे ताब्यात असलेला उपरोक्त वाहन ट्रक / ट्रॅक्टर क्रमांक ................................ ट्राली क्रमांक ................. हे माझ्या मालकीचे आहे/ मी उपरोक्त वाहनाचा चालक असून सदरचे वाहन श्री. ..............................................., पत्ता .......... ........................... यांच्या मालकीचे आहे.

गौण खनिज वाहतूक करणेकामी माझेकडे कोणत्याही सक्षम अधिकाऱ्याने दिलेला परवाना नाही.

अनाधिकृत गौण खनिजाची वाहतूक करणे हा शासकीय मालमत्ता चोरून नेणे अशा स्वरूपाचा गुन्हा आहे याची मला कल्पना असूनही मी हे कृत्य केले आहे.

सदरच्या मी दिलेल्या जबाबावा मी सही / अंगठा करणेपुर्वी तो मला वाचून दाखविला असून तो माझे माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे. सदरचा जबाब मी स्वखुशीने, कोणत्याही दबावाला बळी न पडता दिलेला आहे.

हा जबाब दिला.

जबाब देणाऱ्याची सही /अंगठा

समक्ष

तलाठी / मंडळ अधिकारी /

तहसीलदार / उपविभागीय अधिकारी

दिनांक: ........./.........../२०

☞ **<u>अनधिकृत गौणखनिज उत्खनन पंचनामा</u>**

**पंचनामा**

आम्ही खाली सही करणार

१) श्री. ............................................................................ वय..............., धंदा ....................

राहणार मौजे.........................तालुका..............................जिल्हा.............

२) श्री. ............................................................................ वय..............., धंदा ....................

राहणार मौजे.........................तालुका..............................जिल्हा.............

..................................................................... यांनी घटनास्थळी समक्ष बोलाविलेवरून हजर झालो. सदर अधिकाऱ्याने केलेल्या विनंती वरुन आम्ही पंच म्हणून काम करण्यास तयार आहोत. आम्ही पंच या नात्याने, समक्ष परिस्थितीची पाहणी करून खालील प्रमाणे पंचनामा लिहून देते की, मौजे ...................... ता. ................... जि..............येथील ............................ (नदीचे/ओढ्याचे नाव) पात्रातून / गट/सर्वे नं. ............................ येथे/ .......................... या रस्त्यालगत अंदाजे ...................... ब्रास, वाळू / मुरूम / दगड / माती / खडी या प्रकारचे गौणखनिज असल्याचे दिसून येत आहे.

आसपास चौकशी केल्यावर सदरचे उत्खनन/साठा श्री. ...................................................................... यांनी अनधिकृतरित्या केले आहे असे लोक सांगतात.

सदरचा पंचनामा आज दिनांक ......./........./२०....... रोजी वेळ ............वाजता सुरु करून वेळ ..........वाजता संपविण्यात आला.

सही

१)..............................................

समक्ष

नाव -

२)...............................................

तलाठी / मंडळ अधिकारी

नाव -

तहसीलदार

दिनांक: ..../..../२०

☞ **<u>अनाधिकृत गौणखनिज दंड आदेश</u>**

तहसील कार्यालय / उपविभागीय अधिकारी कार्यालय
क्रमांक: गौ.ख./ कावि /     /२०
दिनांक :-   /    /२०

वाचले :-

१) तलाठी, मौजे ............, ता..........., जिल्हा ............यांचेकडील अहवाल, दिनांक....../.......२०

२) या कार्यालयाची नोटीस- जमा-३ / कावि /   /  दिनांक....../.......२०

३) दिनांक....../.......२०.. रोजीचा श्री. ........................................................... यांचा जबाब

४) दिनांक....../.......२०.. रोजीचा पंचनामा.

५) श्री.                                  यांचा लेखी खुलासा दिनांक....../.......२०

६) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४८ (७)

ooo

**आदेश**

ज्या अर्थी श्री. ......................................................... रा. ............................ यांनी दिनांक....../.......२० रोजी मौजे ..................... ता. .................जिल्हा..... येथील खालील स्थळावर, एकूण ......................... ब्रास वाळू / मुरूम / दगड / माती / खडी या प्रकारच्या, शासकीय मालकीच्या गौण खनिजाचे अनधिकृतरित्या उत्खनन केले आहे/ वाहतूक केली आहे ही बाब सिध्द झाली आहे.

उपरोक्त श्री. ........................................ यांनी केलेले उपरोक्त कृत्य, अनधिकृतरित्या केल्याचे त्यांनी त्यांच्या जबाबात कबूल केले आहे.

त्या अर्थी, मी, ........................... तहसीलदार .............................. तालुका...............जिल्हा.................., महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४८ (७) मधील तरतुदीनुसार गौणखनिजाचे अवैध उत्खनन/ वाहतूक यापोटी खालील प्रमाणे दंडाची आकारणी करण्याचा आदेश देत आहे.

| गौणखनिज प्रकार | अनाधिकृत उत्खनन (ब्रास) | बाजार मूल्याची किंमत (रूपये) | बाजार मूल्याचे पाच पट रक्कम (रूपये) | स्वामित्वधन (रूपये) | जागा भाडे (रूपये) | एकूण (रूपये) (स्तंभ ४+५+६) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |
| एकूण रक्कम रुपये: | | | | | | |

उपरोक्त रक्कम आदेश मिळाल्यापासून तीन दिवसाचे आंत मुख्य लेखाशीर्ष ........................ या लेखाशीर्ष खाली चलनाचे शासकीय खजिन्यांत भरणा करणेत यावी व चलनाची मुळ प्रत या कार्यालयास मुदतीत सादर करावी.

मुदतीत रक्कम भरणा न केल्यास महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १७६ ते १८४ मधील तरतुदीनुसार रक्कम वसुलीची कार्यवाही करणेत येईल याची नोंद घ्यावी.

सदरचा आदेश आज रोजी माझे सही व शिक्यानिशी दिला असे.

ठिकाण :

दिनांक : / /२०    मुद्रा    तहसीलदार / उपविभागीय अधिकारी

प्रती,
श्री.
रा.

प्रत :- तलाठी / मंडळ अधिकारी

२/- सदरचा आदेश संबंधीतास तात्काळ बजावून त्यांची दिनांकित स्वाक्षरी घेण्यात यावी. संबंधीताने मुदतीत आदेशांत नमूद केलेली दंड रक्कम शासकीय खजिन्यांत भरणा न केल्यास आदेशातील नमूद तरतुदीन्वये विनाविलंब कार्यवाही करणेत यावी.

तहसीलदार / उपविभागीय अधिकारी

☞ **<u>दगड खाणपट्टा मिळणेसाठी लागणारी कागदपत्रे</u>**

१) संबंधित जागेचा सातबारा उतारा
२) ज्या ठिकाणी उत्खनन करावयाचे आहे त्या जागेचा स्थळ दर्शक नकाशा
३) तहसिलदार यांचेकडील ऐपत प्रमाणपत्र
४) जागेच्या मालकीबाबतचा पुरावा
५) इतर व्यक्तीची जमीन असेल तर त्या व्यक्तो संमतीपत्र
६) तहसिलदार यांचा स्थळ पहाणी अहवाल
७) संबंधित ग्रामपंचायतीचा ना हरकत प्रमाणपत्र
८) जमीनीत सहहिस्सेदार असतील तर त्या सर्वांचे संमतीपत्र
९) स्फोटकाबाबत फौजदारी शाखेचा ना हरकत दाखला.
१०) इतर काही आवश्यक कागदपत्रे मागणी केल्यास ती कागदपत्रे

☞ **<u>दगड खाणपट्टा मिळणेसाठी अर्ज</u>**

**नमुना अ** दिनांक

**दगड खाणपट्टा भाड्याने मिळणेसाठी अर्ज**

(नियम २१ पहा)

प्रती,

मा. जिल्हाधिकारी, --------------

मा. महोदय,

मी/आम्ही खाली सही/सह्या करणार, विनतीपूर्वक सादर करतो की, आम्हाला खालील विवरणात नमूद दगड खाण -------- वर्षांसाठी भाड्याने देण्यात यावी.

१) अर्जदार/रांचे नांव:

अ) नागरीकत्व:

ब) व्यवसाय:

क) तात्पुरता पत्ता:

ड) कायमचा पत्ता:

२) अर्ज केलेल्या जमिनीचे वर्णन:

अ) स्थळ आणि चतु:सीमा:

ब) गट/सर्व्हे क्र.:

क) गावाचे नाव, तालुका:

ड) क्षेत्र:

३) प्राप्त करण्यात येणाऱ्या गौण खनिजाचे नाव:

४) गौण खनिजाचा वापर कशासाठी करणार:

५) भाडेपट्टा कालावधी:

सोबत आवश्यक ती सर्व कागदपत्रे जोडलेली आहेत. अन्य कागदपत्रांची आवश्यकता असल्यास मी/आम्ही ती सादर करू.

तरी, आपणास विनंती की, उपरोक्त खाण मला/आम्हाला भाडेपट्ट्याने देण्यात यावी.

आपले विश्वासू

## ☞ **स्टोन क्रशर परवाना मिळणेसाठी लागणारी कागदपत्रे**

| |
|---|
| १) संबंधित जागेचा सातबारा उतारा |
| २) ज्या ठिकाणी स्टोन क्रशर लावायचा आहे त्या जागेचा स्थळ दर्शक नकाशा |
| ३) जागेचा अकृषिक आदेश |
| ४) महाराष्ट्र प्रदूषण महामंडळाचे प्रमाणपत्र |
| ५) उद्योग केंद्राचे प्रमाणपत्र |
| ६) जागेच्या मालकीबाबतचा पुरावा |
| ७) इतर व्यक्तीची जमीन असेल तर त्या व्यक्तो संमतीपत्र |
| ८) तहसिलदार यांचा स्थळ पहाणी अहवाल |
| ९) संबंधित ग्रामपंचायतीचा ना हरकत प्रमाणपत्र |
| १०) जमीनीत सहहिस्सेदार असतील तर त्या सर्वांचे संमतीपत्र |
| ११) इतर काही आवश्यक कागदपत्रे मागणी केल्यास ती कागदपत्रे |

## ☞ **स्टोन क्रशर परवाना मिळणेसाठी अर्ज**

प्रती,

मा. जिल्हाधिकारी, --------------

मा. महोदय,

मला/आम्हाला मौजे................, ता. .................... जिल्हा ............. येथील गट/सर्व्हे क्र. .............. क्षेत्र ............. या खाजगी/शासकीय जागेत स्टोन क्रशर लावण्याची परवानगी देण्यात यावी ही विनंती.

१) अर्जदार/रांचे नांव:

अ) नागरीकत्व:

ब) व्यवसाय:

क) तात्पुरता पत्ता:

ड) कायमचा पत्ता:

२) अर्ज केलेल्या जमिनीचे वर्णन:

अ) स्थळ आणि चतु:सीमा:

ब) गट/सर्व्हे क्र.:

क) गावाचे नाव, तालुका:

ड) क्षेत्र:

सोबत आवश्यक ती सर्व कागदपत्रे जोडलेली आहेत. अन्य कागदपत्रांची आवश्यकता असल्यास मी/आम्ही ती सादर करू.
तरी, आपणास विनंती की, उपरोक्त जागेत स्टोन क्रशर लावण्यास परवानगी देण्यात यावी.

आपले विश्वासू

☞ **<u>खाण तपासणी नमुना</u>**

| | | |
|---|---|---|
| १ | गावाचे नांव | |
| २ | तपासणीची तारीख | |
| ३ | तपासणी अधिकारी यांचे नाव व हुद्दा | |
| ४ | मागील तपासणीची तपासणीची तारीख व तपासणी अधिकारी यांचे नाव व हुद्दा | |
| ५ | खाण ज्या ठिकाणी आहे त्या जमिनीचा गट नं./स.न. गावाचे नांव व क्षेत्र | |
| ६ | जागा सरकारी आहे किंवा खाजगी | |
| ७ | जागा खाजगी व्यक्तीची असल्यास मालकाचे नांव व पत्ता | |
| ८ | भाडे करार असल्यास तो केलेल्या व्यक्तीचे नांव व कराराचा कालावधी | |
| ९ | करार कोणत्या बाबीसाठी करणेत आला आहे ? | |
| १० | आजरोजी खाणीची खोली किती आहे? | |
| ११ | करार ज्या कारणासाठी करण्यात आलेला आहे त्या बाबीकरीताच त्या जागेचा वापर केला जातो काय ? | |
| १२ | जागेचा बिनशेती मंजूरी आदेश क्रमांक, दिनांक, कालावधी व प्रयोजन | |
| १३ | खडी क्रशर बसविण्यासाठी जिल्हाधिकारी यांचा आदेश क्रमांक, दिनांक व कालावधी | |
| १४ | खाण ज्या रस्त्याजवळ आहे त्या रस्त्याचे नांव व खाणीपासूनचे अंतर | |
| १५ | ब्लास्टिंगचे काम लोक वापरासाठी असलेल्या जागेपासून ५० फुट ते २०० फुटाचे आंत केले जाते किंवा कसे ? | |
| १६ | खाणीसाठी स्फोटक परवाना घेतला आहे काय ? असल्यांस त्याची मुदत काय ? | |
| १७ | रॉयल्टीची रक्कम खाण मालक हे किती कालावधीसाठी भरतात (तिमाही, सहामाही, वार्षिक) | |
| १८ | मागील रॉयल्टी भरल्याचा दिनांक व रक्कम तपशील नमूद करावा ? | |
| १९ | दगड खाणी साठी मंजूर केलेल्या क्षेत्राचे सीमांकन व हद्दीच्या खुणा लावल्या आहेत काय ? | |
| २० | सदरचे ठिकाणी खडी क्रशर व हॉट मिक्स प्लांट लावला आहे काय ? त्यासाठी बिनशेती परवानगी व प्रदूषण नियंत्रण मंडळाचे नाहरकत प्रमाणपत्र | |

| | | |
|---|---|---|
| | घेतले आहे काय ? *(तपशील द्यावा)* | |
| २१ | गौण खनिज नियमाप्रमाणे ठराविक खोलीत खोदकाम केले आहे काय ? | |
| २२ | पुढील प्रकारच्या नोंदवह्या ठेवल्या आहेत काय ?<br>अ) दैनिक दगड उत्खनन नोंदवही:<br>ब) दैनिक दगड क्रशिंग व उपलब्ध खडी नोंदवही:<br>क) दगड/ खडी विक्री नोंदवही:<br>*(प्रत्येक ग्राहकनिहाय नोंद आहे काय हे पहावे)*<br>ड) कॅशमेमो :<br>*(कॅशमेमोत विक्रीचा दर दर्शविणेत आला आहे काय हे पहावे)* | |
| २३ | सदरचे ठिकाण काम करणारे मजुरांचे आरोग्य व किमान वेतन बाबत नोंदवह्या ठेवल्या आहेत<br>किंवा कसे ? याबाबतचा तपशील नमूद करावा. | |
| २४ | सदर जागेचा मंजूर नकाशा व उत्खनन क्षेत्राचा नकाशा साईटवर ठेवला आहे काय ? | |
| २५ | करारनामा ज्यांचे नांवांवर मंजूर आहे त्याचे<br>व्यतिरिक्त गौणखनिज उत्खनन इतर व्यक्ती करत आहे काय ? | |
| २६ | स्टोन क्रशरसाठी जनरेटर वापरात आहे कि विद्यूत पुरवठ्यावर ? | |
| २७ | विद्यूत पुरवठ्याव्यतिरीक्त जनरेटरही आहे काय?<br>*(जनरेटर किती वापरला याबाबत डिझेल खरेदीचे तपशील बिलावरून घ्यावेत)* | |
| २८ | एका महिन्यांत किती युनिट वीज<br>वापरली जाते ?<br>*(विद्यूत बिलावरून बिलावरून मिटर रिडींग नमुद करावेत)* | |
| | ***सोबत अनुक्रमांक ५, ८, १२, १३, १६, १७, १८, २०, २८ बाबतचे पुरावे जोडावे.*** | |
| २९ | तपासणी अधिकारी यांचा अभिप्राय व दिनांकीत स्वाक्षरी :<br>*(जरूरतर स्वतंत्र कागद जोडावा)* | |

☞ **<u>उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांना पत्र:</u>**

तहसील कार्यालय ...........
क्रमांक: गौ.ख./ कावि /  /२०
दिनांक :- / /२०

प्रती,

उपप्रादेशिक परिवहन अधिकारी,

......................................

विषय :- गौणखनिजाची अनाधिकृत आणि वाहन क्षमतेपेक्षा अधिक वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कार्यवाही करणेबाबत.

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यात येते कि, गौणखनिजाची अनाधिकृत आणि वाहन क्षमतेपेक्षा अधिक वाहतूक करणाऱ्या वाहनांवर मोटार व्हेईकल ॲक्ट, कलम ८६(५) अन्वये खालीलप्रमाणे कारवाई करण्याची तरतुद आहे.

| **अ.न.** | **वाहनाचा प्रकार** | **तडजोड शुल्क** | | |
|---|---|---|---|---|
| | | **पहिला गुन्हा** | **दुसरा गुन्हा** | **तिसरा गुन्हा** |
| १ | ट्रक | १५ दिवस परवाना निलंबन | ३० दिवस परवाना निलंबन | परवाना रद्द प्रस्ताव |
| २ | डिलिव्हरी व्हॅन | १५ दिवस परवाना निलंबन | ३० दिवस परवाना निलंबन | परवाना रद्द प्रस्ताव |
| ३ | ट्रक्टर ट्रेलर | १५ दिवस परवाना निलंबन | ३० दिवस परवाना निलंबन | परवाना रद्द प्रस्ताव |

तहसील कार्यालय, .................च्या भरारीपथकाने गौणखनिजाची अनाधिकृत वाहतूक करणाऱ्या ट्रक / टेम्पो / ट्रक्टर क्रमांक ------------------------ यास गौणखनिजाची अनाधिकृत वाहतूक करण्याचा पहिला/दुसरा/तिसरा गुन्हा करतांना पकडला आहे. सदरचे वाहन आपण ताब्यात घेऊन त्याविरुध्द मोटार व्हेईकल ॲक्ट अन्वये कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल माहितीस्तव या कार्यालयास पाठवावा हि विनंती.

तहसिलदार ............

प्रत - अपर जिल्हाधिकारी, ............. (गौणखनिज शाखा) यांचेकडे माहितीसाठी सादर.

## ☞ **गौण खनिज उत्खनन परवानगीसाठी आवश्यक कागदपत्रे.**

१) संबंधित जागेचा सातबारा उतारा
२) ज्या ठिकाणी उत्खनन करावयाचे आहे त्या जागेचा स्थळ दर्शक नकाशा
३) तहसिलदार यांचेकडील ऐपत प्रमाणपत्र
४) जागेच्या मालकीबाबतचा पुरावा
५) इतर व्यक्तीची जमीन असेल तर त्या व्यक्तो संमतीपत्र
६) मंडळअधिकारी यांचा स्थळ पहाणी अहवाल
७) संबंधित ग्रामपंचायतीचा ना हरकत प्रमाणपत्र
८) जमीनीत सहहिस्सेदार असतील तर त्या सर्वांचे संमतीपत्र
९) प्रचलित दराने गौण खनिजाची रक्कम जमा केल्याचे चलन
१०) इतर काही आवश्यक कागदपत्रे मागणी केल्यास ती कागदपत्रे

## ☞ **गौण खनिज उत्खनन परवानगीसाठी मिळणेसाठी अर्ज**

प्रती, दिनांक
मा. जिल्हाधिकारी/ उपविभागीय अधिकारी/तहसिलदार, --------------

मा. महोदय,
मी खाली सही करणार, विनंतीपूर्वक सादर करतो की, मला खालील विवरणात नमूद गौण खनिजाची आवश्यकता आहे. तरी त्यासाठी परवानगी देण्यात यावी.

१) अर्जदार/रांचे नांव:
अ) नागरीकत्व:
ब) व्यवसाय:
क) पत्ता:
२) अर्ज केलेल्या जमिनीचे वर्णन:
अ) स्थळ आणि चतु:सीमा:
ब) गट/सव्हे क्र.:
क) गावाचे नाव, तालुका:
ड) क्षेत्र:
३) प्राप्त करण्यात येणाऱ्या गौण खनिजाचे नाव:
४) गौण खनिजाचे प्रमाण (ब्रास मध्ये):
५) गौण खनिजाचा वापर कशासाठी करणार:
६) गौण खनिज उत्खननाचा कालावधी:
७) गौण खनिजाची वाहतूक करणार असल्यास वाहन क्रमांक:

सोबत आवश्यक ती सर्व कागदपत्रे जोडलेली आहेत. अन्य कागदपत्रांची आवश्यकता असल्यास मी/आम्ही ती सादर करू.
तरी, आपणास विनंती की, मला/आम्हाला गौण खनिज उत्खननाची परवानगी देण्यात यावी.

आपले विश्वासू

☞ **<u>अनाधिकृत गौणखनिज वाहतूक / उत्खनन अहवाल -</u>**

प्रती, दिनांक :- / /२०

मा. तहसिलदार --------------

विषय - गौणखनिजाचे अनाधिकृत उत्खनन / वाहतूक अहवाल.

मा. महोदय,

दिनांक / / रोजी गांव ------------------------ तालुका ------------------- जि. येथे दगड / मुरूम / वाळू / माती / खडीचे अनाधिकृत उत्खनन / वाहतूक चालू असल्याचे आढळून आल्यावरून कारवाई करण्यात आली आहे. सदर बाबतचा जबाब आणि पंचनामा सोबत सादर करीत आहे. तरी पुढील कारवाई होणेस विनंती आहे.

| गांव | गौणखनिज | | वाहन | | वाहन चालकाचे व मालकाचे नांव व पत्ता |
|---|---|---|---|---|---|
| | प्रकार | ब्रास | प्रकार | क्रमांक | |
| | | | | | |

सविनय सादर,

(नाव)

तलाठी / मंडळ अधिकारी -------------

ता.

☞ **<u>विटभट्टी नोंदवही:</u>**

| गावाचे नाव: | | | तालुका: | | दिनांक: |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | गावाचे नाव | विटभट्टी चालकाचे नाव | विटभट्टी लावलेल्या जागेचा तपशील *(मालकाच्या नावासह)* | बिनशेती आदेशाचा तपशील | विटभट्टी लावणारी व्यक्ती जातीने कुंभार असल्यास त्याचा पुरावा आणि ओळखपत्राचा तपशील. *(पुरावे सोबत जोडावे)* |
| | | | | | |
| | | | | | |

मंडळ अधिकारी: तलाठी:

सही सही

नाव नाव

शिक्का शिक्का

☞ **<u>विटभट्टी तपासणी नमुना</u>**

| | | |
|---|---|---|
| १ | गावाचे नांव | |
| २ | तपासणीची तारीख | |
| ३ | तपासणी अधिकारी यांचे नाव व हुद्दा | |
| ४ | मागील तपासणीची तपासणीची तारीख व तपासणी अधिकारी यांचे नाव व हुद्दा | |
| ५ | विटभट्टीसाठी सक्षम अधिकाऱ्याने दिलेल्या परवानगीचा तपशील. | |
| ६ | विटभट्टी ज्या ठिकाणी आहे त्या जमिनीचा गट नं./स.न. गावाचे नांव व क्षेत्र | |
| ७ | जागा सरकारी आहे किंवा खाजगी | |
| ८ | जागा खाजगी व्यक्तीची असल्यास मालकाचे नांव व पत्ता | |
| ९ | विटभट्टी भाडे करारावर असल्यास तो केलेल्या व्यक्तीचे नांव व कराराचा कालावधी | |
| १० | बिनशेती मंजूरी आदेश क्रमांक, दिनांक, कालावधी व प्रयोजन तसेच बिनशेती सारा भरल्याचा तपशील. | |
| ११ | विटभट्टी केव्हापासून सुरू आहे? | |

| | | |
|---|---|---|
| १२ | विटभट्टीसाठी आवश्यक इतर अनुषंगिक परवाने प्राप्त केले आहेत काय ? | |
| १३ | विटभट्टीधारक व्यक्ती कुंभार समाजाची आहे काय? असल्यास जातीच्या दाखल्याचा तपशील. | |
| १४ | विटभट्टीधारकाकडे सक्षम अधिकाऱ्याने दिलेले ओळखपत्र आहे काय? | |
| १५ | तपासणीच्या दिवशी विटभट्टीवर प्रत्यक्ष आढळून येणाऱ्या कच्च्या व पक्क्या विटांची संख्या. | |
| १६ | विटभट्टीवरील कामगारांची संख्या. | स्त्री- पुरूष- मुले- |
| १७ | विटभट्टीवर बाल कामगार आहेत काय? | |
| | ***सोबत अनुक्रमांक ५, ६, ९, १०, १२, १३, १४ बाबतचे पुरावे जोडावे.*** | |
| १८ | तपासणी अधिकारी यांचा अभिप्राय व दिनांकीत स्वाक्षरी :<br>*(जरूरतर स्वतंत्र कागद जोडावा)* | |